जोडपत्र ३

विभागाच्या / कार्यालयाच्या दर्शनी भागात प्रसिध्द करावयाचा योजनानिहाय नागरिकांच्या सनदेचा नमुना

विभागाचे / कार्यालयाचे नाव :-ग्रामविकास व पंचायतराज विभाग, महाराष्ट्र राज्य

| अ.क्र. | योजनेचे नाव | योजना मंजूर करण्याची कालमर्यादा (कार्य दिवसांमध्ये) | योजना मंजूर करणारे प्राधिकरण / अधिकारी | विलंब झाल्यास तक्रार दाखल करण्यासाठी संबंधित अधिकारी |
|---|---|---|---|---|
| १ | प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण | केंद्र शासनाच्या निकषानुसार | ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार | |

जोडपत्र ४

संकेतस्थळावर प्रसिध्द करावयाच्या योजनानिहाय नागरिकांच्या सनदेचा नमुना

विभागाचे / कार्यालयाचे नाव :- ग्रामविकास व पंचायतराज विभाग, महाराष्ट्र राज्य

योजनेचे नाव :- प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण

| | | |
|---|---|---|
| १ | योजनेचा संक्षिप्त तपशिल | • ग्रामीण भागातील कच्चे घर/ बेघर कुटुंबांना मुलभूत सुविधांसह घरकुलाचा लाभ देणेसाठी “सर्वांसाठी घरे” या उद्देशाने १ एप्रिल, २०१६ पासून प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण सुरू.<br>• घरकुलाचे २६९ चौ.फू.चटई क्षेत्रात स्वयंपाक घर व शौचालयासह बांधकाम अपेक्षित.<br>• घरकुल बांधकामाकरिता क्षेत्रात रु. १.२० लक्ष लाभार्थी अर्थसहाय्य अनुज्ञेय आहे.<br>• योजनेंतर्गत प्राप्त होणा-या उद्दिष्टाच्या ६०%उद्दिष्ट हे अनुसूचित जाती/ अनुसूचित जमाती (SC/ST),इतर (Others)-२५% व अल्पसंख्यांक (Minority)-१५% प्रवर्गास वितरीत करण्यात येते आणि संपूर्ण उद्दिष्टाच्या ५% उद्दिष्ट दिव्यांग व्यक्तींसाठी राखीव ठेवणे बंधनकारक आहे.<br>• ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार मार्फत विकसीत केलेल्या आवास सॉफ्ट AwaasSoft व Public Fund Management System (PFMS) प्रणालीद्वारे लाभार्थ्यांना निधी वितरीत करण्यात येतो.<br>• आवास ॲप मार्फत घरकुल बांधकामाचे भौगोलीक परिक्षण(Geo-Tagging) करण्यात येते.<br>• केंद्र व राज्य निधी वाटपाचे प्रमाण **६०:४०** असे आहे.<br>• योजनेच्या राज्यस्तरीय बँक खात्यातून (State Nodal Account) लाभार्थ्यांच्या बँक /पोस्ट खात्यामध्ये टप्पानिहाय निधी AwaasSoft **व** PFMS प्रणालीद्वारे Direct Benefit Transfer (DBT) योजनेंतर्गत वितरीत करण्यात येतो.<br>• घरकुल अनुदाना व्यतिरिक्त शासननिर्णय ४ एप्रिल २०२५ नुसार सन २०२४-२५ मध्ये प्राप्त उद्दिष्टांमधून मंजूर करण्यात येणाऱ्या लाभार्थ्यांना रू. ५०,०००/- अतिरीक्त अनुदान (रू ३५०००/- घरकुलास अतिरीक्त अनुदान आणि रू. १५०००/- प्रधानमंत्री सुर्यघर योजनेतून छतावर १kw मर्यादेपर्यंत सौरउर्जा यंत्रणा उभारणीकरिता),<br>• स्वच्छ भारत अभियान (SBM) अंतर्गत पात्र लाभार्थ्यास रु.१२,०००/- शौचालय बांधकामासाठी प्रोत्साहनपर अनुदान<br>• मनरेगा (MGNREGA) अंतर्गत ९०इतक्या अकुशल मनुष्य दिवसांची मजूरी देण्यात येते. (साधारणपणे रु.२८,०८०/-). |

| | | |
|---|---|---|
| २ | **योजनेच्या पात्रतेचे निकष** | • ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील पत्र प्रआयो-जी-२०१ /प्र.क्र.२०३/योजना-१० दिनांक ०१/०८/२०१६ रोजीच्या मार्गदर्श सूचनेनुसार सामाजिक, आर्थिक व जात सर्व्हेक्षण (**SECC** २०११) माहितीच्या आधारे ग्रामसभेमार्फत तयार केलेल् कायमस्वरुपी प्रतिक्षा यादी (**PWL**) मधून व सन २०१८-१९ मध् प्रपत्र ड अंतर्गत झालेल्या सर्वेक्षणाच्या आधारे ग्रामसभेमार्फ तयार केलेल्या कायमस्वरुपी प्रतिक्षा यादी (**PWL**) मधू लाभार्थ्यांची निवड करण्यात येते.<br>• लाभार्थी कुटुंबाने महाराष्ट्र राज्यात कोठेही घरकुल योजनेचा ला घेतलेला नसावा. |
| ३ | योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे | • आधार कार्ड<br>• जॉबकार्ड<br>• बँक पासबुक |
| ४ | योजनेसाठी ऑनलाईन अर्ज करण्यासाठी विभागाचे संकेतस्थळ | https://pmayg.dord.gov.in/netiayHome/home.aspx |
| ५ | आवश्यक शुल्क (लागू असल्यास) | लागू नाही |
| ६ | शुल्क भरण्याची पध्दत | लागू नाही |
| ७ | योजना मंजूरीसाठी लागणारा कालावधी | केंद्र शासनाच्या निकषानुसार |
| ८ | योजना मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी | ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार |
| ९ | योजनेसंदर्भात तक्रार निराकरण करणारे अधिकारी | |